# राज्य उत्पादन शुल्क

## १. सीआर/१६७/सांगली/१४

फिर्यादी हे सांगली जिल्हयातील शिराळा तालक्यातील रहिवाशी असून हॉटेल व्यवसायिक आहेत. फिर्यादी यांच्या परमिट रुम परवाना नूतनीकरणासाठी आरोपी लोकसेवक क्र.१ बालाजी शिवाजी माने, निरीक्षक, वर्ग—२ व आरोपी लोकसेवक क्र.२ कुमार देवबा कोळी, उपनिरीक्षक वर्ग—३ राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालय इस्लामपुर यांनी दिनांक ०३/०३/२०१४ रोजी रु.२,००,०००/— लाचेची मागणी करुन ती आरोपी खाजगी व्यक्ती विनायक भानुदास जाधव मार्फत स्वीकारली.

सदरबाबत इस्लामपुर पोलीस ठाणे, जि.सांगली, भाग—६, गु.र.नं. ०५/२०१४,कलम ७, ९, १२, १३(१)(ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून आरोपी लोकसेवक यांना आरोपी खाजगी इसमासह अटक करण्यात आली आहे.

## २. सीआर/१६९/ठाणे/१५

तक्रारदार यांच्या विरूध्द अे.सी.बी., ठाणे विभाग येथे लाच मागितल्या प्रकरणी दिनांक २२/०१/२०१५ रोजी गुन्हा दाखल आहे. सदर केसमध्ये तक्रारदार यांना निलंबित करू नये, त्यांची बदली करू नये, त्यांच्या पदोन्नतीस बाधा येवू नये, तसेच त्यांच्यावर कोर्टात केस दाखल करण्यासाठी खटल्यास मंजुरी देऊ नये, या सर्व गोष्टी तक्रारदाराच्या बाजुने करण्यासाठी अधिक्षक, अंचुळे व निरीक्षक, धनशेट्टी हे तक्रारदार यांच्याकडे ‘‘तक्रारादाराविरुध्द अे.सी.बी., ठाणे विभाग येथील दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने निलंबन तसेच इतर कारवाई होऊ नये म्हणून आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्या नांवाने रु.१८,००,०००/— लाच मागितल्याचे पडताळणी पंचनाम्यात निष्पन्न झाले आहे.’’

वर नमुद आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडून रु.१८,००,०००/— परितोषण म्हणून भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्यावर प्रभाव पाडण्यासाठी स्विकारण्याचे कबुल करुन ते स्विकारले म्हणून लोकसेवक १) रमेश मारूती धनशेट्टी, निरीक्षक व २) मनोहर माणिकराव अंचुळे, अधिक्षक, दोन्ही नेमणूकीस राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, ठाणे यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम ८, १३(१)(ड) सह १३(२) अन्वये कोपरी पोलीस स्टेशन गु.रं.नं.।। ३/२०१५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ८, १३(१)(ड) सह १३(२) नुसार गुन्हा दाखल केला असून, सदर दाखल गुन्हयात नमूद दोन्ही आरोपीत लोकसेवक यांना दिनांक १९/०२/२०१५ रोजी अटक करण्यात आली आहे.

Anti Corruption Bureau Maharashtra ACB ला.प्र.वि. Our Work is Our Mission